NAAC A ++ Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## एम.फिल. व पीएच.डी. विशेष प्रवेश प्रक्रिया २०२१-२०२२

(फक्त राखीव प्रवर्गातील रिक्त जागांकरिता)

शिवाजी विद्यापीठामार्फत एम.फिल व पीएच.डी. विशेष प्रवेश प्रक्रियेकरिता राखीव प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागणी करणेत येत आहेत. सदर प्रवेश प्रक्रिया **University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of M.Phil./Ph.D. Degrees) Regulations, 2016** नुसार राबविण्यात येणार आहे. सदर नियमावली, विद्यापीठाची विषयनिहाय राखीव प्रवर्गातील रिक्त जागांकरिता प्रवेश क्षमता व माहिती पुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in मध्ये **"M.Phil./ Ph.D. Special Admission Drive- 2021-22"** या लिंकवर उपलब्ध आहेत.

ऑनलाईन अर्ज संबंधित विद्यार्थ्यांने सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून भरावा. भरलेल्या अर्जामध्ये काही तांत्रिक दुरुस्त्या असतील तर त्या mphilphd@unishivaji.ac.in या ईमेलवर दि. 20/05/2021 पूर्वी कळविण्याचे आहेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दुरुस्त्यांचा विचार केला जाणार नाही.

1. ऑनलाईन अर्ज दि. 04/06/2022 दु. 12 पासून ते 18/06/2022 रात्री 12.00 वाजेपर्यंत.
2. प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच विद्यार्थ्यांना डाऊनलोडिंग करीता नंतर उपलब्ध करण्यात येईल.

**महत्त्वाच्या सूचना :-**

1. सदर प्रवेश प्रक्रिया फक्त राखीव प्रवर्गातील रिक्त जागांसाठी आहे. विषयनिहाय व प्रवर्गनिहाय रिक्त जागा विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तरी विद्यार्थ्यांनी विषयनिहाय प्रवर्गनिहाय उपलब्ध जागा लक्षात घेवून त्याप्रमाणे अर्ज करावेत.
2. विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेबाबतच्या अटी व तरतुदी काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.
3. एम.फिल./पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेसाठी शिवाजी विद्यापीठाद्वारे प्रवेश परीक्षा व मौखिक परीक्षा नियमानुसार आयोजित करण्यात येईल.
4. एम.फिल./पीएच.डी. विशेष प्रवेश प्रकीया शैक्षणिक वर्ष 2021–22 मधिल राखीव संवर्गातील रिक्त जागांकरिता आयोजित केली असल्याने, सदर प्रवेश प्रकीयेकरीता शैक्षणिक वर्ष 2020–21 मध्ये पदव्युत्तर पदवी अंतिम वर्षाची परीक्षा देवून उत्तीर्ण (प्रवेश पात्रतेच्या निकषानुसार पात्र असणारे) झालेले अथवा त्यापूर्वी पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण (प्रवेश पात्रतेच्या निकषानुसार पात्र असणारे) विद्यार्थी प्रवेश प्रकियेसाठी पात्र असतील.
5. संवर्गनिहाय सामाजिक आरक्षण व अपंग आरक्षण महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार/तरतुदीनुसार लागू राहिल.
6. ज्या विषयांसाठी राखीव संवर्गातील प्रवेश क्षमता आहे अशाच विषयांकरीता संबंधीत संवर्गातील विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा. प्रवेश क्षमता नसलेल्या विषयासाठी अर्ज व प्रवेश परीक्षा शुल्क भरल्यास त्यास विद्यापीठ कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा याबाबत तक्रारी/पत्र स्वीकारले जाणार नाहीत.
7. एम.फिल./पीएच.डी. करीता विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी नियमानुसार व संबंधीत अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेच्या निकषानुसार करण्यात येईल.
8. विद्यार्थ्यांकरीता ऑनलाईन अर्ज web link **http://www.unishivaji.ac.in/online_portal/** वर उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेकरीता अर्ज ऑनलाईन माध्यमातून दि. 04/06/2022 रोजी दुपारी 12.00 पासून दि. 18/06/2022 रोजी रात्री 12.00 वा. पर्यंत भरावयाचे आहेत.
9. विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जाची प्रत विद्यापीठास पाठवू नये. तथापि विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जाची छापील प्रत काढून स्वतःच्या माहितीसाठी ठेवावी.
10. एम.फील./पीएच.डी परीक्षेकरिता रुपये 600/– (Non Refundable) इतके शुल्क भरण्याकरिता पेमेंट गेटवे सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शुल्क भरण्याबाबत Confirmation झाल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्रवेश परीक्षेसाठी एकदा भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.
11. ज्या विषयाकरीता राखीव संवर्गातील रिक्त जागांसाठी प्रवेश क्षमता जाहीर केली आहे, त्याच विषयाची प्रवेश परीक्षा आयोजित केली जाईल याची नोंद घ्यावी.
12. प्रवेश पात्रतेच्या अटींच्या अधिन राहून ज्या विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक विषयांच्या प्रवेश परीक्षेकरिता अर्ज करावयाचा आहे, अशा विषयांचे अर्ज स्वतंत्र भरावेत. तसेच प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र शुल्क भरावे.
13. अपुरे शुल्काचे अर्ज / विनाशुल्क अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.
14. एम.फिल., पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. तसेच परीक्षा विषयक इतर आवश्यक माहिती विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर स्वतंत्रपणे वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. तेंव्हा सर्व संबंधितांनी सदर माहिती संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावी.
15. प्रवेश परीक्षा ही एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेशासाठीची पात्रता परीक्षा असेल. सदर प्रवेश परीक्षा 100 गुणांची असेल. (प्रत्येकी दोन गुणांचे 50 बहुपर्यायी प्रश्न) प्रवेश परीक्षेमध्ये पात्र होणेकरीता खुल्या गटातील उमेदवारांकरिता 50 टक्के गुण तसेच राखीव गटातील उमेदवारांकरिता **(SC/ST/VJ-NT (Non-Creamy layers/OBC (Non-Creamy layers) / SEBC (Non-Creamy layers) / EWS/Differently-abled category)** ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. चुकीच्या उत्तरास गुण कपात करण्यात येणार नाहीत.
16. प्रवेश परीक्षेकरीता **Research Methodology** वर आधारीत 50 गुणांची परीक्षा व पदव्युत्तर विषयास अनुसरून 50 गुणांची परीक्षा याप्रमाणे अभ्यासक्रम राहील. सदर अभ्यासक्रम वेबसाईट वर उपलब्ध आहे.
17. अर्ज भरताना तांत्रिक अडचणी आल्यास सदर अर्जाबाबत संगणक केंद्राच्या 0231–2609096 तसेच अन्य माहितीकरिता विद्यापीठाच्या पी.जी. बीयुटीआर विभागातील 0231–2609139 या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा mphilphd@unishivaji.ac.in या मेलवर कळविण्यात यावे.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक. 04/06/2022

प्रभारी कुलसचिव